# माननीय संचालक मंडळ सभेचे
## प्रतिवृत्त पुस्तक

दिनांक १८.१२.२००० पासून दिनांक २६ [illegible]

प्रशासकीय हस्त दि. ३.५.०२ ते २० [illegible]

# मा. संचालक मंडळ सभा

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | सभांची तारीख | पान क्र. | अ.क्र. | सभांची तारीख | पान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ८. | १८.१२.२००० | १ | | | |
| ९. | १३.०२.२००१ | ३२ | | | |
| ~~२००१-२००२~~ | | | | | |
| १. | ०३.०४.२००१ | ४२ | | | |
| २. | ०६.०६.२००१ | ७४ | | | |
| ३. | ३१.०७.२००१ | १०० | | | |
| ४. | २८.०८.२००१ | १२२ | | | |
| ५. | २४.११.२००१ | १३६ | | | |
| ६. | १५.०१.२००२ | १४६ | | | |
| ७. | २६.०२.२००२ | १५६ | | | |
| २००२-०३ | प्रशासकीय काळ | | | | |
| १. | ०३.०५.२००२ | १७१ | | | |
| २. | ०६.०५.२००२ | १७३ | | | |
| ३. | १६.०५.२००२ | | | | |

"प्रमाणित करण्यात येते की,
ह्या पुस्तकात अ.क्र. १ ते ४०० पाने आहेत.

प्रभारी व्यवस्थापक
दि नागपूर डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को-ऑप,
बँक लि, नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा मंगळवार, दिनांक १९.१२.२००० रोजी दुपारी २.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात" बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

| | |
|---|---|
| १. मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा. श्री. र. गो. बंग | संचालक |
| ४. मा. श्री. भा. वे. शहाणे | " |
| ५. मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ६. मा. श्री. व. श्रा. वांढे | " |
| ७. मा. श्री. वे. ल. कोल्हे | " |
| ८. मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| ९. मा. श्री. सं. लि. चोरे | " |
| १०. मा. श्री. श्रा. ग. घवड | " |
| ११. मा. श्री. वि. रा. दुलके | " |
| १२. मा. श्री. ना. र. जीभकाटे | " |
| १३. मा. श्री. वि. आ. राऊत | " |
| १४. मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १५. मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| १६. मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १७. मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १८. मा. श्री. ब. श्रा. तायवाडे | " |
| १९. मा. श्री. मु. रि. पन्नासे | " |
| २०. मा. श्री. अ. शं. धार्मिक | " |
| २१. मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| २२. मा. सौ. कु. ग. किंमतकर | संचालिका |
| २३. मा. सौ. स्मिताताई कुंभारे | " |

२४. मा. श्रीमती सुमनताई बावनकुळे, अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर.

२५. मा. श्री. एस. बी. पाटील, जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर.

| | |
|---|---|
| २६. मा. श्री. वि. जी. शहाणे | कर्मचारी प्रतिनिधी |
| २७. मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

म - अनुपस्थित -

१. मा. श्री. अ. य. गुजर संचालक
२. मा. श्री. र. पां. गावंडे "
३. मा. श्री. चं. तु. समर्थ "
४. मा. श्री. अ. ना. पोरेड्डीवार, प्रतिनिधी, महा. राज्य सह. बँक म. मुंबई.
५. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक) नागपूर.
६. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
७. मा. विभागीय अधिकारी, महा. राज्य सह. बँक म. विभागीय कार्यालय, नागपूर.
८ मा. श्री. एल. जी. चौधरी - - कर्मचारी प्रतिनिधी.

---

मा. श्री. अ. य. गुजर, मा. श्री. र. पां. गावंडे, मा. श्री. चं. तु. समर्थ, संचालक सभेला उपस्थित नसल्याने त्यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली व यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली. सभेला उपस्थितांचे स्वागत करून विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस मा. अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक ३०.१०.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना मा. श्री. बंग संचालक म्हणाले की, ज्या खरेदी विक्री संस्थांची - आर्थिक स्थिती चांगली असेल त्यांना घरघुती वापराकरिता गॅस कनेक्शन विक्रीबाबतचा व्यवसाय देण्यांत यावा. यावर मा. अध्यक्ष यांनी गॅस कनेक्शन विक्री बाबतचा व्यवसाय देतांना संस्थेची आर्थिक परिस्थिती पाहूनच निर्णय घेण्यांत येईल असे सांगितले. बॅरिस्टर वानखेडे सह. सुत गिरणीला मंजूर केलेल्या कर्जवितरणापूर्वी कर्जवसुलीबाबत शासकीय हमी घेऊन कर्जवाटप करावे अशी अट घालण्यांत यावी. या मा. श्री. मो. वि. निमजे यांनी केलेल्या सुचनेला मा. अध्यक्ष यांनी मान्यता दिली व कर्जवितरणाच्या अटीत या अटीचा समावेश करण्यांत यावा असे सांगितले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक ३०.१०.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक 30.10.2000 रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत मा. सरव्यवस्थापक यांनी केलेल्या कार्यवाहीची सभेला थोडक्यांत माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ :- तज्ञ समितीचे सन २००१-२००२ हंगामाकरिता शिफारस केलेले पीककर्जाचे एकरी दर व धोरण मंजूर करुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या; मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन २००१-२००२ च्या हंगामाकरिता नागपूर जिल्ह्यातील पिक कर्ज दर ठरविण्याकरिता तज्ञ समितीची सभा दिनांक २५.११.२००० रोजी घेण्यांत आली. या सभेत बियाणे, औषधी व खताचे वाढलेले भाव, तसेच दिवसेंदिवस मजूरीचे दरांत झालेली वाढ याबाबत विचार करुन साधारणतः ५% ते २०% पर्यंत वाढ करावी. तसेच दिवसेंदिवस ओलीताखालील क्षेत्रांत होणारी वाढ पिक उत्पादनासाठी आधुनिक पध्दतीचा होणारा अवलंब शेतकऱ्यांचा नगदी पीक घेण्यामागील कल या बाबी विचारांत घेउन नगदी कर्जाचे प्रमाण ६५% व वस्तुरुप कर्जाचे प्रमाण ३५% करण्याबाबत शिफारस करण्यांत आली. तज्ञ समितीने शिफारस केलेले दर व त्या संबंधीचे धोरण मंजूरीकरिता सभेसमोर ठेवण्यांत आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन तज्ञ समितीने शिफारस केलेल्या सन २००१-२००२ च्या हंगामाकरिता पीक कर्जाचे एकरी दर व धोरण मंजूर करण्यांत आले. हे दर मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि; मुंबई यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्यांत यावे असे ठरले.

| अ.क्र. पीकाचे नांव | तज्ञ समितीने शिफारस केलेले एकरी दर (2001-2002) | | | मा. संचालक मंडळाने मंजूर केलेले एकरी दर (2001-2002) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नगदी | वस्तुरुप | एकुण | नगदी | वस्तुरुप | एकुण |
| १) खरीप हंगाम : | | | | | | |
| अ) ओलीत पीके | | | | | | |
| १. धान अ.ऊ.दे. | २५०० | १४०० | ३९०० | २५०० | १४०० | ३९०० |
| २. ज्वारी अ.ऊ.दे. | १४०० | ८०० | २२०० | १४०० | ८०० | २२०० |
| ३. कापूस ओलीत | ३१०० | १६०० | ४७०० | ३१०० | १६०० | ४७०० |
| ४. तुर | १६०० | ८०० | २४०० | १६०० | ८०० | २४०० |
| ५. मिरची | २९०० | १५०० | ४४०० | २९०० | १५०० | ४४०० |
| ६. संत्रा (प्रति झाड) | ४० | २२ | ६२ | ४० | २२ | ६२ |
| ७. केळी | ३९०० | २१०० | ६००० | ३९०० | २१०० | ६००० |
| ८. भाजीपाला | १६०० | ८०० | २४०० | १६०० | ८०० | २४०० |
| ९. ऊसपूर्व हंगाम | ६००० | ३२०० | ९२०० | ६००० | ३२०० | ९२०० |

| अ.क्र. पिकाचे नांव | तज्ञ समितीने शिफारस केलेले एकरी दर (2001-2002) | | | मा. संचालक मंडळाने मंजूर केलेले एकरी दर (2001-2002) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नगदी | वस्तुरुप | एकुण | नगदी | वस्तुरुप | एकुण. |
| १०. ऊस सुरु हंगाम | ५५०० | २९०० | ८४०० | ५५०० | २९०० | ८४०० |
| ११. ऊस खोडवा | ४६०० | २४०० | ७००० | ४६०० | २४०० | ७००० |
| १२. चारा पिके लुसर्न | १६०० | ८०० | २४०० | १६०० | ८०० | २४०० |
| १३. चारा पिके बरसीम | १२०० | ६०० | १८०० | १२०० | ६०० | १८०० |
| १४. अद्रक/लसुन/हळद | १२०० | ६०० | १८०० | १२०० | ६०० | १८०० |
| १५. पानमळा (मशागत) | १३०० | ७०० | २००० | १३०० | ७०० | २००० |
| ब) **कोरड पिके :** | | | | | | |
| १. कापूस | २१०० | ११०० | ३२०० | २१०० | ११०० | ३२०० |
| २. धान | १००० | ६०० | १६०० | १००० | ६०० | १६०० |
| ३. ज्वारी | १३०० | ७०० | २००० | १३०० | ७०० | २००० |
| ४. मिरची | १८०० | १००० | २८०० | १८०० | १००० | २८०० |
| ५. भुईमुंग | २१०० | १२०० | ३३०० | २१०० | १२०० | ३३०० |
| ६. सोयाबिन | १७०० | ९०० | २६०० | १७०० | ९०० | २६०० |
| ७. तुर | १३०० | ७०० | २००० | १३०० | ७०० | २००० |
| २] **रब्बी/उन्हाळी** | | | | | | |
| १. गहू अ.कु.दे.ओ. | २००० | १००० | ३००० | २००० | १००० | ३००० |
| २. गहू अ.कु.दे.ओ. | १२०० | ६०० | १८०० | १२०० | ६०० | १८०० |
| ३. चना ओलीत | १५०० | ८०० | २३०० | १५०० | ८०० | २३०० |
| ४. चना कोरड | १२०० | ६०० | १८०० | १२०० | ६०० | १८०० |
| ५. जवस | ८०० | ४०० | १२०० | ८०० | ४०० | १२०० |
| ६. तिळ | ९०० | ५०० | १४०० | ९०० | ५०० | १४०० |
| ७. करडई/सुर्यफुल | १२०० | ६०० | १८०० | १२०० | ६०० | १८०० |
| ८. भुईमुंग उन्हाळी | २७०० | १५०० | ४२०० | २७०० | १५०० | ४२०० |
| ९. सोयाबीन | १७०० | ९०० | २६०० | १७०० | ९०० | २६०० |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ४ – मयत वैयक्तीक सभासदांचे शेअर्स तबदिली बाबत मा. सहकार आयुक्त यांचेकडून आलेल्या अहवालावर चर्चा करणे.

ठराव क्रमांक ४ :– मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या वैयक्तीक सभासदांचा मृत्यु झाल्यास त्यांचेकडे असणारे बँकेचे सर्व घेणे वसुल करून घेऊन उर्वरित कांही बाकी शिल्लक असल्यास त्यांचे शेअर्सची रक्कम मयत सभासदाने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीस अथवा अशा व्यक्ती नसल्यास मा. संचालक मंडळाचे दृष्टीने योग्य वारस असलेल्या व्यक्ती त्यांच्या अर्ज प्राप्ती पासून एक वर्षाचे आंत परत करावी असा उल्लेख बँकेच्या उपविधी क्रमांक १६ मध्ये आहे. सदर प्रावधान महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० मधील कलम ३०(१) ते (४) मधील तरतुदींना अनुसरून आहे. बँकेच्या उपविधी क्रमांक १७

नुसार बँकेचे सध्या असलेल्या वैयक्तीक सभासदांना नविन हिस्से धारण करता येणार नाही. व बँकेला नविन वैयक्तीक सभासदत्वाकरिता सभासदत्व देता येणार नाही. बँकेच्या वैयक्तीक सभासदांच्या संदर्भात माननीय सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे शेअर्स तबदीली बाबत मार्गदर्शन मागविण्यांत आले होते. त्यांनी दिनांक ५.७.२००० चे पत्राप्रमाणे सहकार खात्याचे धोरणानुसार जिल्हा बँकेतील वैयक्तीक सभासद न करणे व असलेले वैयक्तीक सभासद कमी करणे याबाबत कळविले आहे. त्यानुसार मयत सभासदांच्या शेअर्सची रक्कम मुल्यांकन करून वारसानांना परत करण्याच्या दृष्टीने बँकेने कायदा, पोटनियम विचारांत घेवुन धोरण ठरवावे व कार्यवाही करावी असेही सुचविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा करतांना मा. श्री. पननासे, संचालक म्हणाले की, यापूर्वी चुकीचे पध्दतीने शेअर्स तबदील करून सभासदत्व दिलेल्या सभासदांना सुध्दा निर्णय घेवुन कमी करण्यांत यावे. यावर मा. अध्यक्ष म्हणाले की, चुकीच्या पध्दतीने शेअर्स तबदील करून सभासदत्व दिले गेले असल्यास त्यावर योग्य तो निर्णय घेण्यांत येईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन वैयक्तिक सभासदाचे शेअर्स तबदीली बाबत मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांनी कळविल्याप्रमाणे वैयक्तीक सभासद न करणे व असलेले वैयक्तीक सभासद (त्यांचे मृत्युनंतर) कमी करणे बाबतचे अहवाला संदर्भात दिलेल्या माहितीची नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५ :- तिरुपती अर्बन को-ऑप. बँकेच्या मुदती ठेवीवरील व्याजाबाबत ...

ठराव क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, तिरुपती अर्बन कोऑप. बँकेनी बँकेत ठेव ठेवतेवेळी मुदती ठेवीत ठेवण्या बाबतचा उल्लेख असलेले ठराव देवुन दिनांक ३१.५.९५ पासून बँकेचे महाल शाखेत ठेवीवरील व्याज कसे जमा करायचे याबाबत कुठल्याही सुचना न देता रु. ५११८३०००/- च्या ठेवी ठेवल्या आहेत. तिरुपती अर्बन को ऑप. बँकेनी मुदती ठेवीत ठेवलेल्या ठेवीवर व्याजाची मागणी कधीही केलेली नाही. त्यापूर्वी देखील वेळोवेळी ठेवी ठेवून व्याजाची उचल केलेली आहे. कधीही ठेव पुनर्गुंतवणुकीत ठेवणे बाबत विचारणा केलेली नाही. बँकेत असलेल्या मुदती ठेवीवर दिनांक ३१.८.२००० पर्यंत एकूण व्याज रु. ७०१८२२१/- आकारण्यांत आलेले आहे. परंतु तिरुपती अर्बन कोऑप. बँकेने त्यांचे दि. ३०.९.२००० चे पत्राद्वारे वरील ठेवी पुनर्गुंतवणुकीत असल्याचे कळवून त्यानुसार व्याजाची मागणी केली आहे. बँकेचे सन ९८-९९ व ९९-२००० चे वार्षिक हिशेब पूर्ण झाले

आहेत. त्यानुसार तिरूपती कोऑप. बँकेस पुनर्गुंतवणुक ठेवीबाबत विचार करणे शक्य नसल्याचे दिनांक २१/२३.१०.२०००चे पत्रान्वये कळविण्यांत आले आहे. सदर बँकेने पुन्हा त्यांचे पत्र दिनांक २१.११.२०००नुसार सदर प्रकरणी पुनर्विचार व्हावा अशी विनंती केली असून दिनांक ३०.९.९८ ते ३१.८.२००० या कालावधीत पेअबल झालेल्या रकमांवर त्या त्या ठरावीक वेळी लागू असलेल्या मुदती ठेवींच्या व्याज दरांनी व्याज देण्यांत यावे असा पर्याय सुचविला आहे. आपले बँकेच्या ९८-९९ व ९९-२००० या वर्षाचे हिशेब पूर्ण झाले असून, बँकेच्या हिशोबाकरिता असलेल्या नियमामुळे येणाऱ्या तांत्रीक अडचणी विचारांत घेता तिरूपती अर्बन कोऑप. बँकेनी सुचविलेल्या पर्यायानुसार बँकेला व्यवहार करता येणार नाही.

विषयावर चर्चा करतांना मा. श्री. पाराशिवनीकर संचालक म्हणाले की, तिरूपती अर्बन कोऑप बँकेने मुदती ठेवीत ठेवलेल्या ठेवींच्या पावत्यांवर (प्रमाणपत्रांवर) पुनर्गुंतवणुकीचा स्टँप असून त्यावर रेषा मारल्या आहेत. तेव्हा अशा पावत्या बाबत तपासणी करून पुनर्गुंतवणुकीचे दराने व्याज दिले जावे. मा. अध्यक्ष म्हणाले की, तिरूपती अर्बन कोऑप बँकेच्या अध्यक्षांशी झालेल्या चर्चेच्या वेळी कोणतेही दस्ताऐवज व प्रमाणपत्र दाखविले नाही. म्हणून ठेव ठेवते वेळी सादर केलेल्या दस्ताऐवज — कागदपत्र असतील त्याप्रमाणे ठेवीचे सर्टीफिकेट तपासून व्याज देता येईल असे सांगितले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन तिरूपती अर्बन कोऑप. बँकेनी दिनांक १९.५.९५ पासून महाल शाखेत ठेवलेल्या ठेवींच्या पावत्यांची व ठेव ठेवतेवेळी सादर केलेल्या आवश्यक दस्ताऐवज व कागदपत्रांची तपासणी करून त्याप्रमाणे निर्णय घेण्याचे अधिकार मा० अध्यक्षांना देण्यांत यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ :- जप्तीतील वाहनांचे दिनांक ८.९.२००० रोजी झालेल्या लिलावाबाबत माहिती देणे.

ठराव क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेची कर्जबाकी थकित झाल्याने थकित कर्जबाकीचे परतफेडी करिता बँकेने जप्त केलेल्या बँक कर्जावरील वाहनांचा व बँकेच्या मालकीच्या एका जीपचा जाहिर लिलाव दिनांक ८.९.२००० रोजी दुपारी २.०० वाजतां कळमना शाखेचे आवारांत, दैनिक वर्तमान पत्रांत सदर लिलावाबाबत जाहिरांत देऊन करण्यांत आला. या लिलावामध्ये ६ वाहनांची अपेक्षित किंमत आल्यामुळे लिलाव विक्री कायम करण्यांत आली. या लिलावांत ६ वाहनांचे विक्रीपोटी

एकूण रुपये ८.७५ लाख कर्जवसुली करण्यांत आली. अपेक्षित किंमत न आल्याने उर्वरित वाहनांचा लिलाव स्थगित ठेवण्यांत आला. त्यापैकी बँकेच्या मालकीची महिन्द्रा कमांडर जीप क्रमांक एम.एच. ३१ - ७५८६ दिनांक १८.११.२००० रोजी रुपये १.५७ लाख किंमतीत वाटाघाटी करुन विकण्यांत आली. सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | थकबाकीदार सभासदाचे नांव | संस्थेचे नांव | वाहनाचे नांव | र.न. | लिलावांत आलेली किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | सर्वश्री - | | | | |
| १. | ईश्वर मारोती वाळगोटे | धर्मासेवा सह. सोसायटी. | महिन्द्रा ट्रॅक्टर | एमएच ३१ जी ४१६८ | ०.८२ लाख |
| २. | शंकर उपाशा सावंत | अडेगांव सेवा सह. सोसायटी. | ——— " ——— | एमएच ३१ जी ३७४६ | ०.६० लाख |
| ३. | पुनुलाल चुन्नीलाल पालीवाल | पारशिवनी सेवा सह. सोसा. | मॅसीफर्ग्युसन ट्रॅक्टर ट्राली | एमएच ३१ जी २०५४ जी ४४२० | ०.८७ लाख |
| ४. | परसराम रामलाल मेहूतकर | उबाळी सेवा सह. सोसा. | एचएमटी ट्रॅक्टर ट्राली | एमएच ३१ झेड ६३०४ झेड ६४९२ | १.९५ लाख |
| ५. | राजीव कृष्णराव ठाकरे | बोरगांव सेवा सह. सोसा. | टाटा सुमो जीप | एमएच ३१ झेड २५८६ | १.९६ लाख |
| ६ | ओंकार तेजराव पारवे | ——— | प्रवासी बस | एमएच ३५ - ६२८ | १.५५ लाख |
| | | | | | एकूण ८.७५ लाख |

लिलावांत अपेक्षित किंमत न आल्याने लिलाव स्थगित ठेवल्यानंतर वाटाघाटीत झालेली विक्री व वसुली.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | बँकेच्या मालकीची जीप | ——— | महिन्द्रा कमांडर | एम.एच ३१ एच ७५८६ | १.५७ लाख |

जप्तीमधील लिलाव न झालेल्या वाहनांची माहिती.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | सुनील गणपतराव झाडे | कोतेवाडा सेवा सोसा. | स्वराज ट्रॅक्टर | एमएच ३१ झेड ८४६१ | स्थगित |
| २. | सुभाष रामाजी हजारे | झोडेश्वर सेवा सोसा. | ट्रॅक्स [illegible] | एमएच ३१ झेड ५२१ | स्थगित |
| ३. | भुपेंद्र तेजराव पारवे | ——— | प्रवासी बस | एमएच ३१ एम ५५८३ | स्थगित |

विषयावर सविस्तर चर्चा करतांना मा. श्री. तायवाडे संचालक म्हणाले की, जप्तीतील वाहनांचा लिलावाद्वारे झालेल्या विक्रीतून झालेली कर्जवसुली फारच कमी असल्याचे दिसून येते, तेव्हा उर्वरित कर्जबाकीची वसुली कशी व कोठून करणार असा प्रश्न उपस्थित केला असतां मा. सरव्यवस्थापक यांनी उर्वरित कर्जरकमेची वसुली त्यांचे शेती मधील शेतमाल विक्री करुन व त्यातुनही वसुली होत नसल्यास शेती किंवा गहाणांत दिलेल्या इतर स्थावर मालमत्तेचा लिलाव करुन करण्यांत येईल, असे सांगितले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन जप्तीतील वाहनांची दिनांक ८.१.२००० रोजी झालेल्या लिलावाबाबतची दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७:- बँकेच्या उत्पन्नाची निश्चिती, कर्जाचे वर्गीकरण करावयाच्या तरतुदी आणि इतर अनुषंगिक बाबी बाबत माहिती देणे.

ठराव क्रमांक ७:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, रिझर्व बँक ऑफ इंडियाचे परिपत्रक क्र. आर.पी.सी.डी. नं. बी.सी. १५५/०७/३७.०२/९५-९६ दिनांक २२.७.१९९६ अनुसार अनुत्पादक कर्जे निर्धारित करण्यासंबंधी सुचना देण्यात आल्या होत्या. सदर पत्राचे अनुषंगाने बँकेने परिपत्रक काढून एन.पी.ए. कर्जाकरिता खालीलप्रमाणे सूत्र अवलंबीले होते.

| | शेती कर्जे | अल्पमुदती कर्ज खरीप | अल्पमुदती कर्ज रबी | मध्यम मुदती कर्ज |
|---|---|---|---|---|
| अ. | कर्ज दिल्याचा महिना - | एप्रिल ९९ | आक्टो. ९९ | सप्टें. ९९ |
| ब. | देय महिना - | मार्च २००० | मे २० | मार्च २०००. |
| क. | थकित होण्याचा महिना - | एप्रिल २००० | जून २००० | एप्रिल २००० |
| ड. | अनुत्पादक कर्जाचा महिना - | एप्रिल २००१ | जून २००१ | एप्रिल २००१ |
| ई. | तरतुद करण्याचा महिना - | मार्च २००२ | मार्च २००२ | मार्च २००२ |

रिझर्व बँक ऑफ इंडियाने त्यांचे परिपत्रक क्र. आर.पी.सी.डी.आर.एफ.बी.सी. २९/०७.३७.०२/२०००.०१ दिनांक १०.१०.२००० अनुसार पास्ट ड्युची संकल्पना दिनांक ३१ मार्च २००१ पासून बंद करण्यांत येत असल्याचे कळविले असून त्या तारखेपासून अनुत्पादक कर्जासंदर्भात खालील प्रमाणे बदल सुचविले आहेत.

१. मुदती कर्जावरील व्याज आणि/किंवा हप्ता १८० दिवसांपेक्षा अधिक काळ देय असल्यास.

२. ओव्हर ड्राफ्ट/कॅश क्रेडीटमध्ये खाते १८० दिवसापेक्षा अधिक काळपर्यंत मर्यादे चे वर असल्यास.

३. बिल्स परचेस/डिस्काउंटमध्ये खाते १८० दिवसापेक्षा अधिक काळपर्यंत थकित असल्यास.

४. शेती कर्जामध्ये व्याज आणि/किंवा मुद्दलाचा हप्ता २ हंगामाकरिता थकित असल्यास, परंतु दोन अर्ध वर्षापेक्षा अधिक काळाकरिता नसल्यास.

५. इतर खात्यासंबंधी अशा सर्व रकमा ज्या १८० दिवसापेक्षा अधिक थकित असल्यास.

वरील बदलानुसार शेती कर्जासंबंधी अंमलात येणारे सुत्र खालीलप्रमाणे राहील.

| | शेती कर्जे | अल्पमुदती खरीप कर्जे | अल्पमुदती रब्बी कर्जे | मध्यम मुदती कर्जे |
|---|---|---|---|---|
| अ | कर्ज दिल्याचा महिना - | एप्रील ९९ | आक्टो ९९ | सप्टे. ९९ |
| ब. | देय महिना - | मार्च २००० | मे - २००० | मार्च २००० |
| क | थकित होण्याचा महिना - | मार्च २००० | मे २००० | मार्च २००० |
| ड. | अनुत्पादक कर्जाचा महिना - | मार्च २००१ | मे २००१ | मार्च २००१ |
| ई. | तरतुद करण्याचा महिना - | मार्च २००१ | मार्च २००२ | मार्च २००१ |

विषयावर सविस्तर चर्चा होउन दिनांक ३१ मार्च २००१ पासून पास्ट ड्युची संकल्पना बंद करण्यांत येत असल्यामुळे अनुत्पादक कर्जावरील ३१ मार्च २००१ ला करावयाच्या तरतुदीमध्ये होणाऱ्या बदला संबंधी देण्यात आलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व या संदर्भात झालेल्या बदला बाबतची माहिती बँकेच्या शाखा व संबंधितांना कळविण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ८ :- बँकेच्या कर्मचाऱ्यांना वाहन खरेदीसाठी कर्ज देणेकरिता ठरवून दिलेला निधी संपुष्टात आल्याने सदर निधी वाढविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या कर्मचाऱ्यांना त्यांचे सर्विस कालावधीत जास्तीत जास्त तीन वेळा दुचाकी वाहन खरेदीसाठी सवलतीचे व्याजदरावर कर्ज उपलब्ध करून दिल्या जात असते. व सदर कर्ज उपलब्ध करून देणेकरिता दरवर्षी निधी ठरविला जात असतो. दिनांक २८.४.२००० रोजीचे मा० कर्ज उपसमितीचे सभेत एप्रील २००० ते मार्च २००१ या कालावधीकरिता ठरविण्यांत आलेला रुपये २५.०० लाख (रुपये पंचवीस लाख फक्त) निधी कर्ज वाटपामुळे संपुष्टांत आला असून ह्या निधी पैकी रुपये ११८४००/- निधी शिल्लक आहे. कर्मचाऱ्यांची दुचाकी वाहन खरेदी करणेसाठी होत असलेली मागणी व शिल्लक निधी विचारांत घेता दिनांक ११.१२.२००० रोजीचे मा. कर्ज उपसमितीचे सभेत डिसेंबर २००० ते मार्च २००१ चे कालावधीकरिता रुपये १५.०० लाख (रुपये पंधरा लाख) निधी उपलब्ध करून देण्याची शिफारस केलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन कर्मचाऱ्यांची दुचाकी वाहन खरेदीसाठी होत असलेली मागणी व शिल्लक असलेला निधी तसेच माननीय कर्ज उपसमितीने निधी उपलब्ध करून देण्यास केलेली शिफारस यावर विचार करून डिसेंबर २००० ते मार्च २००१ या कालावधीकरिता कर्मचाऱ्यांना

दुचाकी वाहन खरेदीकरिता कर्ज मंजूरीसाठी रुपये ७५.०० लाख निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यांत येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ :- मे. दिनशॉ डेअरी फुडस प्राय. लि. नागपूरचे नविन प्रकल्प उभारणी करिता रुपये २०.०० कोटी मुदती कर्ज मंजूरी बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मे. दिनशॉ डेअरी फुडस प्राय. लिमी. नागपूर या कंपनीने सादर केलेल्या रुपये ३५.०० कोटीचे प्रकल्प अहवालाबाबत मा० संचालक मंडळ दिनांक ३०.१०.२००० चे सभेत झालेल्या निर्णयाप्रमाणे कंपनीच्या रुपये २०.०० कोटीचा कर्ज मागणी प्रकल्प अहवाल दिनांक १३.११.२००० चे पत्रानुसार आवश्यक कागदपत्रासह मा. मुख्य सरव्यवस्थापक, नाबार्ड, मुंबई तसेच मा. व्यवस्थापक, नाबार्ड, पुणे यांचे कडे पाठविण्यांत आला आहे. सदर प्रकल्प अहवाल नाबार्डचे विचाराधीन असून कमी व्याजदराचे फेरतारण कर्ज उपलब्ध करून देण्यास सहमती दर्शविली आहे. कर्ज सुरक्षिततेसाठी कंपनीने त्यांची कार्यरत असलेल्या फॅक्टरीची मालमत्ता सहतारणांत देण्याबाबत आवश्यक संपूर्ण कागदपत्रे बँकेकडे सादर केली आहेत. यावरून ह्या मालमत्तेचा सर्च व मुल्यांकन बँकेचे पॅनेलवरील वकील व आर्कीटेक्ट तसेच मशिनरी व्हॅल्युअर यांचेकडून करून घेण्यांत आले आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१. मे. दिनशॉ फ्रोजन फुडस प्राय. लि. नागपूर कंपनीची नागपूर महानगर-पालीका हद्दीतील मौजा बोरगांव वार्ड नं. ६१ घर क्र. ८०२(अ)/१०३(ब) ची जमीन, इमारत, फॅन्सस व मशिनरीचे मुल्यांकन रुपये ५७०.४० लाख असून या मालमत्तेवर शिक्षक सहकारी बँकेची रु. १८.८७ लाख चालू कर्ज बाकी आहे.

२ मे. दिनशॉ डेअरी फुडस प्राय. लिमी. नागपूर कंपनीचे नागपूर महानगरपालीका हद्दीतील वार्ड नं. ६१ घर क्र. ८८२ (अ) १०३(अ) ची जमीन इमारत, फॅन्सस व मशिनरीचे मुल्यांकन रुपये १७५७.८८ लाख तसेच युनियन बँक ऑफ इंडिया चे रुपये ८५४.०० लाख असा एकूण रु १०६२.८८ लाखाचा बोझा आहे.

३. पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्र बुटीबोरी (एम.आय.डी.सी. नागपूर) येथील कंपनीने खरेदी केलेल्या प्लाट नं. के ८१ व के ८२ चे मुल्य रुपये ६०.०० लाख आहे. ही मालमत्ता बोझाविरहीत आहे.

मे. दिनशॉ डेअरी फुडस प्राय. लिमी. नागपूर या कंपनीने त्यांचे दिनांक

१३.१२.२००० नुसार कंपनीने प्रकल्प उभारणीचे कामास सुरुवात केली असून, त्वरित कर्ज पुरवठा करणे बाबत बँकेला विनंती केली आहे. बँकेने नाबार्डकडे सादर केलेल्या प्रकल्प अहवालास मान्यता मिळणेसाठी विलंब लागणार असल्याने कंपनीने सादर केलेल्या अर्जानुसार रु.२०.०० कोटी कर्ज मंजूर करून कर्जपुरवठा करण्याचे तसेच नाबार्ड कडून फेरतारण कर्ज उपलब्ध करून घेण्याचे निर्णयार्थ सदर विषय सभेसमोर आणला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेने नाबार्डकडे सादर केलेल्या प्रकल्प अहवालास मान्यता मिळणेकरिता लागणारा विलंब व कमी व्याज दराने फेरतारण कर्ज उपलब्ध करून देण्यास नाबार्डने दर्शविलेली सहमती व मे. दिनशॉ डेअरी फुड्स प्राय. लिमी., नागपूर यांनी प्रकल्प उभारणीचे कामास सुरुवात करून कर्जपुरवठा करण्यास केलेली विनंती यावर विचार करून कंपनीने सादर केलेल्या अर्जानुसार रु.२०.०० कोटी कर्ज मंजूर करून कर्जपुरवठा करण्यांत यावा असे ठरले. कंपनीला कर्जपुरवठा करण्या अगोदर बँकेचे कर्ज सुरक्षिततेसाठी नविन प्रकल्प उभारणीसाठी पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्र बुटीबोरी येथील कंपनीने खरेदी केलेल्या प्लॉट क्र. के ८१ व के ८२ ह्या रुपये ८०.०० लाख किंमत असलेल्या जमिनीचे व त्यावर निर्माण होणारी प्रकल्पा अंतर्गत संपूर्ण मालमत्तेचे रजिस्टर्ड गहाण खत करून घेण्यांत यावे. तसेच कंपनीचे नागपूर महानगरपालिका हद्दीतील मौजा बोरगांव येथील सहतारणांत दिलेल्या वार्ड नं. ६९ घर क्र. ८०२ (अ) व १०३ (ब) ची जमिन, इमारत, प्लॅन्ट्स व मशिनरी या मालमत्तेवर शिक्षक सहकारी बँकेची रु. १८.८७ लाख कर्जबाकी असल्यामुळे उर्वरित रुपये ५०७.५३ लाख मुल्य असलेल्या मालमत्तेवर दुय्यम बोझा निर्माण करून घेण्यात यावा. त्याचप्रमाणे कंपनीने नागपूर महानगरपालीका हद्दीतील वार्ड नं. ६९ मधील सहतारणांत दिलेल्या घर क्र. ८८२ (अ) व १०३ (अ) च्या जमिन इमारत, प्लॅन्ट्स व मशिनरीवर सिकॉम मुदती कर्जबाकी रु. ५८८.८६ लाख आणि युनियन बँक ऑफ इंडियाचे रुपये ८५४.०० लाख कर्जबाकी असल्याने अनुक्रमे प्रथम व द्वितीय बोझा असल्यामुळे उर्वरित रुपये ७१४.८२ लाख मुल्य असलेल्या मालमत्तेवर रेसीड्युयल चार्ज निर्माण करून घ्यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०:- जाहिरातीवरील खर्चाबाबत शासनाने घालून दिलेले निर्बंधा बाबत माहिती देणे.

ठराव क्रमांक १०:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सहकारी बँकांनी जाहिरातीवर करावयाचा खर्च सहकार

व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ११.६.९९ चे पत्रातील आदेशानुसार असावा असे मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी कळविले आहे. सर्व सहकारी संस्थांच्या कामकाजाचे सुयोग्य व्यवस्थापन होणेसाठी व लोकहितास्तव दिनांक ११.६.९९ रोजी आदेश निर्गमित करून जाहिरातीवर करावयाच्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे बंधने घातली आहेत.

१. कोणत्याही व्यक्तीच्या स्वागताकरिता जन्म दिनानिमीत्य अगर कोणत्याही प्रयोजना निमित्य संस्थेचे नांवाने वृत्तपत्रांत, मासीकांत अथवा नियतकालीकांत जाहिरात देवु नये.

२. विविध स्मरणिकांत सहकारी संस्थेची जाहिरात देतांना तिचा खर्च रूपये ५०००/- (रूपये पांच हजार फक्त) पेक्षा जास्त असू नये.

३. तोट्यात असणाऱ्या कोणत्याही संस्थेने जाहिरात देवु नये.

४. जाहिरातीवरील एक वर्षातील एकुण खर्च रु. १.०० लाखापेक्षा अधिक नसावा.

उपरोक्त नमुद केलेल्या बंधनातून कोणत्याही सहकारी बँकेस सुट हवी असल्यास त्यासाठी शासनाची पुर्वपरवानगी घेण्यांत यावी. प्रस्तुत आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या विरूद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार कारवाई करणार असल्याचे बँकेला कळविले आहे. शासनाचे सदर आदेशाबाबत माहिती मागील दिनांक ३१.७.९९ रोजीचे मा. व्यवस्थापक समितीचे सभेत देण्यात आली होती.

विषयावर सविस्तर चर्चा होउन जाहिराती वरील खर्चाबाबत शासनाने घालून दिलेले निर्बंधाबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ११ :- बडेगांव शाखा सावनेर खरेदी विक्री सहकारी सोसायटी चे इमारतीत शिफ्ट करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ११ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेची बडेगांव शाखा किरायाचे ५४२ चौरस फुट जागेत रु. ८५५/- प्रतिमहा किरायाने आहे. ही इमारत गांवातील मुख्य मार्गावर नाही. तसेच अडचणीची असून गैरसोयीची आहे. त्यामुळे बडेगाव शाखेकरिता किरायाने इमारत पाहणे सुरु होते. या कालावधीत सावनेर खरेदी विक्री सहकारी संस्था मर्यादित कडून बडेगांव येथील संस्थेची इमारत बँकेला किरायाने देणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. सदर इमारतीची

जागा ७५० चौरस फुट असुन सदर इमारत पक्के बांधकाम झालेली असून स्लॅबची आहे. गावातील मुख्य मार्गावर आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन सावनेर खरेदी विक्री सहकारी सोसायटीचे बडेगांव येथील इमारतीत शाखा स्थानांतरीत करणेकरिता किरायाने घेण्यांत यावी. सदर इमारतीचा किराया ठरविणे तेथे काउन्टर बसविणेसाठी आर्कीटेक्ट कडून एस्टीमेट तयार करुन घेणे इत्यादिचे अधिकार मा. अध्यक्ष महोदय यांना देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७२ :- पॉली हाऊससाठी कर्जपुरवठा धोरण ठरविणे: सेवा/विविध कार्यकारी सह. संस्थांच्या पात्र शेतकरी सभासदांना हरित गृह (Green House) उभारणी करिता कर्ज पुरवठा धोरणास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्रमांक ७२ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले.व सभेला माहिती देतांना सांगितले की, आजच्या स्पर्धेच्या तसेच जागतिकीकरणाकडे वेगाने वाटचाल करणाऱ्या युगांत पारंपारिक शेती व्यवसायात दिवसेंदिवस सुधारणा व यांत्रीकीकरण होत असून आपल्या शेतमालाला योग्य भाव मिळून शेती व्यवसाय अधिक किफायतशिर होण्याचे दृष्टीने तसेच शेतमालास योग्य विक्रीदर प्राप्त होण्यासाठी शेतमालाचा दर्जा टिकविणेकरिता आवश्यक नियंत्रित वातावरण निर्मितीयुक्त हरीत गृह (Green House) उभारणीसाठी लागणाऱ्या खर्चाचे गुंतवणुकीसाठी बँकेकडे महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर या कार्यालयामार्फत कर्ज मागणी प्रस्ताव प्राप्त होत आहेत. आपले जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना हरित गृह उभारणीकरिता कर्जपुरवठा करण्यासाठी कर्ज धोरण तयार केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हरित गृह उभारणीसाठी कर्ज पुरवठा करणेकरिता खालीलप्रमाणे तयार करण्यांत आलेले धोरण मंजूर करण्यांत आले.

१. <u>कर्ज धोरण</u>

१. संमत धोरणानुसार हरितगृह प्रकल्पासाठी भांडवली कर्ज खाली नमुद केल्याप्रमाणे राहील. (क्षेत्र ५ गुंठे.)

| अ.क्र. | तपशिल | खर्च रक्कम रुपये. |
| --- | --- | --- |
| १ | जी.आय. पाईपमध्ये लोखंडी सांगाडा व बांधकाम इ. पूर्ण | २१७८००/- |
| २. | प्लास्टीक यु.व्ही. फिल्म - २०० मायक्रॉन (बसविणेसह) | ८३६००/- |
| ३. | शेडींग नेट - ५० ते ७५%. (बसविणेसह) | १९५००/- |
| ४. | तापमान, आर्द्रता मापक | ९०००/- |
| ५. | पाणी व्यवस्थापन (अ) ड्रीप सिस्टीम इ. पूर्ण<br>(ब) फिस्टर/मायक्रोस्प्रींक/फॉगिंग सिस्टीम इ. पूर्ण<br>(क) पाण्याची टाकी, इलेक्ट्रीक मोटार्स २ इ. पूर्ण. | ६२८००/- |
| | (अक्षरी रुपये तीन लाख चौरेचाळीस हजार पांचशे फक्त) | रु. ३४४५००/- |

२. हरित गृहांत प्रथम वर्षी घेणाऱ्या पिकानुसार पीकनिहाय खर्च सभासद स्वगुंतवणुक व बँक कर्जाचा तपशिल खाली नमुद केल्यानुसार राहील (क्षेत्र ५ गुंठे)

| अ.क्र | तपशिल | पिकनिहाय खर्चाचा तपशिल ढोबळी मिरची | जरबेरा | कार्नेशन | चेरी टोमॅटो | स्ट्रॉबेरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १.) अ) | खेळते भांडवली खर्च:- | | | | | |
| १. | गादवाफेसाठी तांबडी/माती/निचऱ्याची माती, वाळू इ. | ७००० | ७००० | ७००० | ७००० | ७००० |
| २. | शेणखत भाताचे तुस इ. | ६००० | ६००० | ६००० | ६००० | ६००० |
| ३. | गादीवाफे तयार करुन निर्जंतुकीकरण करणे (फारमॅलीन, मिथील, ब्रोमाईड इ.) | २००० | २००० | २००० | २००० | २००० |
| ४. | रोपे खर्च (कंसात रोपांची संख्या) | १५००० (१०००) | ७५००० (३०००) | १०८००० (५०००) | ३०००० (३०००) | ३०००० (३०००) |
| ५. | लागवड खर्च | १००० | १००० | १००० | १००० | १००० |
| ६. | रासायनिक खते, मायक्रोन्युट्रियंट | ५००० | ५००० | ५००० | ५००० | ५००० |
| ७. | किटकनाशके | ५००० | ५००० | ५००० | ५००० | ५००० |
| ८. | मजूरी-अंतरमशागत, तोडणी इ. | २०००० | २०००० | २०००० | २०००० | २०००० |
| ९. | तदनुषंगिक किरकोळ खर्च | १५०० | १५०० | १५०० | १५०० | १५०० |
| | एकुण (अ) | ६२५०० | १२२५०० | १५५५०० | ७७५०० | ७७५०० |
| | ब) कायम स्वरुपी / भांडवली खर्च | ३४४५०० | ३४४५०० | ३४४५०० | ३४४५०० | ३४४५०० |
| | क) एकुण प्रकल्प खर्च (अ+ब) | ४०७००० | ४६७००० | ५००००० | ४२२००० | ४२२००० |
| | २) सभासद स्वगुंतवणुक २५ टक्के | १०१७५० | ११६७५० | १२५००० | १०५५०० | १०५५०० |
| | ३) बँक कर्ज रक्कम ७५ टक्के | ३०५२५० | ३५०२५० | ३७५००० | ३१६५०० | ३१६५०० |

३. हरित गृहांत घेण्यांत येणाऱ्या पिकांचा तपशिल निश्चित केल्यानुसार (दुसऱ्या वर्षासाठी नविन हंगामातील पिक खर्चासाठी खालील तपशिलानुसार अल्प मुदत पिक कर्ज उपलब्ध करुन देण्यांत येईल. अल्प मुदत पिके कर्जाची मागणी संस्थेच्या क.म. पत्रकांतून करण्यांत यावी. (क्षेत्र ५ गुंठे)

| अं.क्र | तपशिल | ढोबळी मिरची | जरबेरा | कार्नेशन | स्ट्रॉबेरी | टोमॅटो |
|---|---|---|---|---|---|---|
| १: | रोपांचा खर्च (रोपांची संख्या) | १५००० (१०००) | ७५००० (३०००) | १०८००० (६०००) | ३०००० (३०००) | ३०,००० (३०००) |
| २. | गादीवाफे दुरुस्ती निर्जंतुकीकरण इत्यादि | २००० | २००० | २००० | २००० | २००० |
| २ | लागवड खर्च | १००० | १००० | १००० | १००० | १००० |
| ४: | रासायनिक, सेंद्रीय व मायक्रोन्युट्रियन्ट खते | १०००० | १०,००० | १०००० | १०००० | १०००० |
| ५. | किटकनाशके | ५००० | ५००० | ५००० | ५००० | ५००० |
| ६: | तदनुषंगिक किरकोळ खर्च | १००० | १००० | १००० | १००० | १००० |
| | एकुण. | ३४००० | ९४००० | १२७००० | ४९००० | ४९०००. |

३. वरील पिक कर्जाबरोबरच खालील कारणासाठी संस्था सभासदांना तीन वर्षानंतर आवश्यकतेनुसार गुणवत्ता आजमावून कर्ज उपलब्ध करून देता येईल.

१. प्लास्टिक यु.व्ही. फिल्म बदलणेसाठी २०० मायक्रॉन फिल्म - - रु. ८५,०००/-

२. शेडींग नेट बदलणेसाठी - - - - - - - - - - - रु. २००००/-

४. सदर युनिट कॉस्टपेक्षा जास्त रकमेची मागणी असल्यास सदर खर्च अर्जदारास स्वनिधीतून करावा लागेल.

५. कर्जमागणी करणारा अर्जदार हा सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थेचा सभासद असावा. सदर संस्थेमार्फत संबंधीत शाखेच्या तपासणी, शिफारसी व आवश्यक कागदपत्रांचे पुर्ततेसह परिपूर्ण कर्जमागणी प्रस्ताव बँकेचे मुख्य कार्यालयास सादर होणे आवश्यक आहे.

६. संबंधीत सेवा सहकारी संस्था/विविध कार्यकारी संस्था ही नागपूर जिल्हा मध्य. सहकारी बँकेची कर्जदार असावी.

७. अर्जदार हा सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थेचा थकबाकीदार व इतर वित्तीय संस्थांचा कर्जदार नसावा.

८. हरित गृह प्रकल्पासाठी बँक कर्जाची मर्यादा एकूण प्रकल्प खर्चाच्या ७५% राहील.

९. सदर कर्ज रकमेच्या दिडपट मुल्यांकनाची स्थावर संपत्ती (उदा. जमीन/घर/प्लॉट) अर्जदारास बँकेस कर्जापोटी तारण म्हणून गहाण करून द्यावी लागेल त्यासाठी आवश्यक करारनामे बँकेस करून द्यावे लागतील.

१०. अर्जदार सभासदास प्रकल्प खर्चाच्या २५% दराने स्वनिधीतून स्वगुंतवणूक करावी लागेल.

११. सदर कर्ज प्रकरणे शासनाच्या कृषि विभाग/फलोत्पादन विभाग/जिल्हा परिषद/महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ मार्फत शिफारशीसह सादर होणे आवश्यक असून, सदर प्रकल्पांअंतर्गत शासनाने मंजूर केल्यास सदर अनुदानाची रक्कम शासनाने/अर्जदाराने बँकेच्या शाखेत त्वरित जमा करणे आवश्यक आहे. सदर जमा अनुदान रक्कम अर्जदारांचे कर्ज खात्यांत वळती करण्यांत येईल.

१२. सदर मध्यम मुदती प्रकल्पांतर्गत पात्र अर्जदारांस जास्तीत जास्त पांच गुंठे (५४४५ वर्ग फुट) क्षेत्राचे हरितगृह प्रकल्प उभारणीकरिता कर्ज मागणी करता येईल.

१३. अर्जदाराने हरितगृह प्रकल्प उभारणे संदर्भात आवश्यक नकाशे व अंदाजपत्रकासह आर्थिकदृष्ट्या किफायतशीर व तांत्रिकदृष्ट्या सक्षम कृषि पणन मंडळ महाराष्ट्र राज्य यांचे शिफारसीसह प्रकल्प अहवाल आवश्यक कागदपत्रासह संबंधित संस्था व शाखा कार्यालयामार्फत बँकेचे मुख्य कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

१४. कर्जमागणी करणाऱ्या अर्जदाराकडे किमान ५ एकर बोझा विरहीत स्वमालकीची सिंचनाची सोय असलेली जमिन धारणा आवश्यक राहील. तथापी एका सभासदाचे नांवावर अपेक्षित धारणा नसल्यास अथवा कर्जापोटी द्विगुण तारण मुल्यांकन कमी पडल्यास कुटुंबातील अन्य सामिल हक्कदारांनी सहकर्जदार म्हणून संयुक्तरित्या कर्ज मागणी करता येईल.

१५. हरितगृह प्रकल्प उभारणीकरिता अर्जदाराकडे विजेच्या/सिंचनाच्या आवश्यक सुविधासह स्वमालकीची किंवा एकत्रित कुटुंबातील इतर हक्कदारांच्या सामिल मालकीची किमान ५ एकर जमीन असणे आवश्यक राहील.

१६. अर्जदार ज्या एजन्सी/यंत्रणेकडून हरितगृहाची उभारणी करणार आहे, त्याबाबत तपशिलवार नकाशासह नियोजित खर्चाचे अद्यावत कोटेशन कर्ज मागणी प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे. कोटेशनमधील नियोजित खर्चाचे दर हे वास्तव असणे आवश्यक राहील.

१७. कर्जमागणी करणारा अर्जदार हरितगृह प्रकल्पांतर्गत उत्पादित मालाची विक्री ज्या ~~अथवा~~ संस्था अथवा खाजगी एजन्सीचे माध्यमातून करणार आहेत, त्या संस्था/एजन्सीचे दरपत्रक, खरेदी हमीपत्र स्टॅम्प पेपरवर कर्ज प्रकरणासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१८. अर्जदार ज्या एजन्सी/यंत्रणेकडून रूपये तथा इतर आवश्यक सामुग्री खरेदी करणार आहेत, त्या एजन्सी/यंत्रणेचे अद्यावत दरपत्रक कर्ज प्रकरणासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१९. सदर प्रकल्पा अंतर्गत कर्ज परतफेडीचा कालावधी पांच वर्षाचा राहील. तसेच सदर कर्ज परतफेड व्याजासह वार्षिक/दरमहा समान हप्त्यांत करावी लागेल.

२०. सदर प्रकल्पा अंतर्गत शेड बांधकामासाठी मंजूर कर्ज रक्कम दोन हप्त्यांत वितरीत केली जाईल. प्रथम ६०टक्के अग्रिम कर्ज रक्कम बांधकाम साहित्य खरेदी व मजूरीकरिता अदा करण्यांत येईल. उर्वरित ४०टक्के कर्ज रक्कम बांधकाम पूर्ण झाल्या नंतर अदा करण्यांत येईल.

२१. सदर प्रकल्पा अंतर्गत कर्जावरील व्याज दर संस्थेस १३.५०टक्के दराने व सभासदांना १५टक्के दराने राहील.

२२. अर्जदारास कर्ज वाटपापूर्वी संबंधित सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे नियमानुसार शेअर्स १५% स्वगुंतवणुकी व्यतिरिक्त स्वनिधीतून नगदीने खरेदी करावे लागेल.

२३. शेडच्या/पिकांच्या विम्याची तरतुद प्रकल्प खर्चात असणे आवश्यक राहील. अन्यथा लाभार्थींना स्वखर्चाने विमा काढावा लागेल.

२४. सादर करावयाची इतर कागदपत्रे :
१. स्थावर संपत्ती मालकी दर्शविणारे कागदपत्रे.
२. शेत जमीन - ७/१२, ८अ, शेत नकाशा.
३. घर/दुकान/प्लॉट (विकसीत) - शासकीय कराची पावती, विक्रीपत्र/वाटणीपत्र/बक्षिस पत्र

२५. स्थावर संपत्तीवर कर्ज बोझा नसल्याबाबत :
१. शेती/घर/दुकान/प्लॉट - भूविकास बँक, राष्ट्रीयकृत बँका, नो ड्युज, बँकेचे पॅनेलवरील वकिलांचा ५ वर्षाचा सर्च रिपोर्ट.

२६. कर्जपोटी गहाण अंतर्गत देय स्थिर संपत्तीचे मुल्यांकन :
१. शेती असल्यास - महसुल विभागांमार्फत मुल्यांकन प्रमाणपत्र
२. घर/प्लाट/दुकान - शासनाचे परवानाधारक पात्र मुल्यांकन कर्त्याचे (गव्ह. रजिष्टर्ड आर्कीटेक्ट व्हॅल्युअर) चे प्रमाणपत्र.

२७. प्रकल्पास आवश्यक पाणी उपलब्धता प्रमाणपत्र - तंत्रज्ञाकडून प्रमाणपत्र.
२८. प्रकल्पास आवश्यक विद्युत पुरवठा उपलब्धता प्रमाण पत्र - महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
२९ अर्जदाराची वैयक्तीक कर्ज मागणी अर्ज.
३०. संबंधीत सेवा/विविध कार्यकारी संस्थेचा कर्जमागणी अर्ज, व्यवस्थापक कमेटीचा कर्ज मंजूरी/कर्जमागणी ठराव, शिफारसीसह क.म. पत्रक.
३१. कर्ज प्रकरणाबाबत शाखेची शिफारस.
३२. कर्ज प्रकरणांतील संलग्न संपूर्ण कागदपत्रे व्यवस्थीत व सुस्पष्ट करुन मुळ कागदपत्रासह किमान दोन प्रतित संस्थेमार्फत बँकेस सादर करावे लागेल.
३३. प्राप्त कर्ज प्रकरणे मंजूरी अथवा नामंजूरीचे संपूर्ण अधिकार बँकेस राहतील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९३ :- कर्ज वसुलीची कोणतीही शक्यता नसलेल्या थकित संस्थाकडील कर्जबाकी निर्लेखित करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेला संलग्न असलेल्या एकूण संस्थांपैकी दिनांक ३१.३.२०००अखेर अवसायनांत असलेल्या ८८ संस्थांकडे एकूण रुपये १८६८०३३१/- कर्जबाकी असून ही संपूर्ण थकित बाकी आहे. यापैकी संस्थांची नोंदणी तसेच सभासदत्व रद्द झालेआहे अशा ८ संस्था असून, त्यांचेकडे रु. १४८०७७०/- कर्जबाकी असून संस्थांनी खरेदी केलेले हिस्से रक्कम रु.५५५००/- वजा जाता रु.१४२५२७०/- शिल्लक राहते याबाबत संस्थावाईज माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाखा | नोंदणी रद्द झाल्याची तारीख | बँकेचे सभासदत्व रद्द झाल्याची तारीख | संस्थेकडे असलेली कर्जबाकी रु. | संस्थेने खरेदी केलेले हिस्से एकूण रुपयांत. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कुंभार कारागिर सह. संस्था बोरगांव ता. कामठी | गांधीबाग | ३१.३.६६ | १०.६.६९ | १४११/- | — |
| २. | प्रकाश टेलरिंग औद्यो. सह. संस्था, नागपूर | गांधीबाग | ३०.३.६३ | २०.१.६७ | २६०६/- | — |
| ३. | नुतन डेअरी सह. संस्था शिवणगांव ता. नागपूर | महाल | ५.६.६६ | १०.६.६९ | ९९३०/- | — |
| ४. | मत्स्य व्यवसाय सह. संस्था कुही. | गांधीबाग | २१.११.६८ | ३०.३.६९ | २९०२/- | — |
| ५. | जयहिंद रंगाई छपाई सह. संस्था खापा ता. सावनेर | खापा | ११.४.६६ | ३०.३.६९ | ३३०१/- | — |
| ६. | राज रेडीमेड सह. संस्था नागपूर. | गांधीबाग | ३१.१.६६ | १०.६.६९ | ४०६२/- | — |
| ७. | विणकर पंचायत सह. संस्था उमरेड | उमरेड | २२.६.६५ | १०.६.६९ | ६१६५१/- | — |
| ८ | खापा विणकर सह. संस्था खापा | खापा | २२.८.६२ | १०.१२.६९ | ११७८९५१/- | ४४००/- |
| | | | | एकूण | ९४८०००/- | ४४००/- |

संस्थांची नोंदणी रद्द झाली, परंतु बँकेच्या सभासद आहे अशा एकूण १३ संस्था असून त्यांचेकडे रुपये ५७८३७५/- बँकेची कर्जबाकी असून संपूर्ण थकित आहे. या संस्थांनी रुपये १०६००/- चे बँकेचे हिस्से घेतलेले असून रुपये ६३१/- बचत फंड शिल्लक आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाखा | नोंदणी रद्द झाल्याची तारीख | बँकेची संस्थेकडे असलेली कर्ज बाकी | संस्थेने खरेदी केलेले हिस्से रुपयांत | बचत फंडाची रक्कम रुपयांत. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विजय लेबर कोऑप. सह. संस्था माथनी ता. मौदा | मौदा | ३१.३.६६ | २२४९/- | — | — |
| २. | आदर्श शिलाई सह. संस्था खापा ता. सावनेर | खापा | ३०.११.६२ | २८३८३/- | — | — |
| ३. | नागपूर कोंबडी/अंडी उत्पादक सह. संस्था म. सावनेर | गांधीबाग | ३०.६.६६ | २६५८/- | — | — |
| ४. | नॅशनल लेदर कोऑप. सोसा. नागपूर | गांधीबाग | १३.१.६९ | ६१०५१/- | २००/- | — |
| ५. | एकता वुडवर्क सह. संस्था मर्या. ~~सावनेर~~ नागपूर | गांधीबाग | १३.१.६९ | २४३०/- | १००/- | — |
| ६. | प्रगती तेल/गुड प्रक्रिया सहकारी संस्था. | सावनेर | २.३.६८ | ५०१७०/- | २०००/- | — |
| ७. | लोकजीवन धिमगर विण. सह. संस्था नागपूर | गांधीबाग | ३०.६.६६ | ४०७/- | — | — |
| ८ | दिनबंधू संयुक्त शेती सह. संस्था | महाल | ८.२.६९ | २९९९५/- | — | — |
| ९. | पाटणसावंगी गुड खांडसरी सह. संस्था, पाटणसावंगी | पाटण सावंगी | ३१.८.६६ | ३८२७०९/- | ७६००/- | — |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | खापा संत्रा बागायतदार सह. संस्था, खापा | जलालखेडा | ३१.८.९९ | १४२०/- | १००/- | — |
| ११. | खापा पोल्ट्री को.ऑप.सो. खापा | खापा | ३१.८.९९ | ८३२८/- | २००/- | — |
| १२. | दास फ्रेम औद्यो. सह. संस्था नागपूर. | गांधीबाग | — | १००६०/- | १००/- | — |
| १३. | सिव्हील लाईन रेसीडेंसीयल कंझुमर्स सह. संस्था, नागपूर. | जिल्हा परिषद | — | १०१५२/- | ३००/- | ६३१/- |
| | | | | ५७८३९५/- | १०७००/- | ६३१/- |

वरील २१ संस्थांची बँकेमार्फत तपासणी घेण्यांत आली असून ह्या संस्थांकडे कोणताही प्रकारची स्थावर/जंगम मालमत्ता नसल्याचे आढळून आले आहे. ह्या संस्थांकडून बँकेचे कर्जाची परतफेड होण्याची शक्यता अजीबात नाही त्यामुळे ह्या अवसायनातील संस्थांची जमा असलेल्या बँक हिस्स्याची रक्कम बँकेच्या कर्जापोटी वसुलीमध्ये वळती करावी लागेल व यानंतर राहिलेल्या कर्जबाकीकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व नियम १९६१ चे कलम ८९ मधील तरतुदीला अनुसरून सदरच्या कर्जापोटी वाईट व थकित निधीची स्वतंत्ररित्या तरतुद करून त्यापोटी हे थकित कर्ज निर्लेखित करावे लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन सदरच्या २१ संस्थांकडील रुपये ७.२२ लाखांचे खर्च संपूर्णपणे थकीत झाले असून "ही रक्कम वसुल होण्यासारखी नाही" असे प्रमाणी करण मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था (बँक) नागपूर यांचेकडून घेण्यांत यावे. अशा थकित व निर्लेखीत करावयाची संस्थांकडील कर्जाची रक्कम निश्चित करून तेवढ्या रकमेची बँकेच्या मार्च २००१ चे ताळेबंदास स्वतंत्रपणे तरतुद करून घेण्यांत यावी. अशाप्रकारे स्वतंत्रपणे तरतुद केलेल्या थकित व वाईट कर्जनिधीतून सदर संस्था कडील थकित कर्जबाकी निर्लेखित करण्याकरिता मा. वार्षिक साधारण सभेची मंजूरी घेण्यांत यावी. हिस्से रक्कम व बचतफंडाची रक्कम कर्ज वसुलीत वळती केल्यानंतर उपरोक्त संस्थांचे बँकेतील सभासदत्व रद्द करण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १८ :- स्वयं सहायता बचत व स्वर्ण जयंती स्वयंरोजगार योजने अंतर्गत बचत गटांना कर्जवाटपाचे धोरणास मंजूरी देणेबाबत.

ठराव क्रमांक १८ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, ग्रामीण भागातील दारिद्र्याचे निर्मुलन होण्याचे दृष्टीने स्वावलंबी महिला गट ची स्थापना करण्यांत आली आहे. या अंतर्गत बचत गटाला फार महत्व असून या बचत गटाच्या माध्यमातून गरजू महिला व त्यांचे कुटुंबियांना कर्जरुपाने आर्थिक मदत देऊन त्यांच्या गरजा भागविल्या जातात. परंतु अशा

गरजा भागवितांना अनेकदा बचत गटाचे भांडवल कमी पडते. अशा वेळेस बचत गटाने बँककडे आर्थिक मदत मागविल्यास ती पूर्ण करता यावी याकरिता बँकेचे बचत गटास कर्जवाटपाचे निश्चित असे धोरण असावे. या दृष्टीने राज्य बँकेचे पत्र क्र. डीआयसी/फा/एसएचजी महिला/४११/२०००-०१/दिनांक २०.७.२०००चे पत्रांतील मार्गदर्शक तत्वांचा इतर जिल्हा बँकांनी ठरविलेल्या धोरणात्मक बाबींचा विचार करून आपल्या बँकेचे या संदर्भातील कर्जधोरण तयार करण्यांत आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन स्वयं सहायता बचत व स्वर्णजयंती स्वयं रोजगार योजनेअंतर्गत बचत गटांना कर्जविषयाकरिता कर्जवाटपाचे तयार करण्यांत आलेले खालीलप्रमाणे धोरणास मान्यता देण्यांत येत आहे.

कर्जधोरण –

१. महिला स्वंसहायता बचत गटातील सभासदांची संख्या सर्वसाधारणपणे १० ते २० च्या दरम्यान असावी.

२. या बचत गटामध्ये एकजिनसीपणाची भावना असण्यासाठी गटांमध्ये समान स्वारस्य, समान आर्थिक व सामाजीक पार्श्वभूमी असणाऱ्या महिला सदस्यांचा समावेश असावा.

३. ज्या गटाचे सक्रिय अस्तित्व किमान ६ महिने असून नियमितपणे गटाच्या बचत निधीतून गटाअंतर्गत कर्जव्यवहार आहे अशाच गटांना मागणीनुसार बँकेने पतपुरवठा उपलब्ध करून द्यावयाचा आहे.

४. बचत गटाने त्यांचे खाते बँकेत किमान सहा महिने अगोदर उघडलेले असावे व नियमीत बचतीमधून कर्जाची देवाण घेवाण वगळता उर्वरित रक्कम नियमितपणे बँकेत जमा केलेली असावी. सोबतच याबाबतची हिशेबपुस्तके नियमीत लिहिल्या गेलेली असावीत.

५. ज्या शुद्ध हेतूने बचत गट स्थापन झालेले आहेत, त्यांची अंमलबजावणी व उद्देश सफल करण्यासाठी गट कार्यान्वित असेल अशाच गटांच्या कर्ज मंजूरीकरिता विचार करता येईल.

६. बचत गटाचे मुल्यांकन पंचायत समिती स्तरावरील अधिकाऱ्यांकडून झालेले असावे. गटाचे मुल्यांकन झाल्या बाबतचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे लागेल. 'अ' किंवा 'ब' श्रेणी मिळालेल्या गटानाच कर्ज मंजूरीचा विचार करण्यांत येईल.

७. ज्या बचत गटास शासनाकडून अनुदान प्राप्त झाले अशी अनुदानाची रक्कम गटाचे बँक खात्यात जमा झाली तर त्या रकमेची अचल संबंधित

खात्याचे परवानगीशिवाय देता येणार नाही. तसेच संबंधीत खात्याची परवानगी असल्यास या अनुदानाचा उपयोग गटाला द्यावयाच्या कर्जासोबत संगुंतवणूक म्हणून करता येईल.

८. बँकेकडे कर्जमागणी करतांना संपूर्ण गटास किंवा गटातील एखाद्या व्यक्तीकरिता वैयक्तीकरित्या गटामार्फत कर्जमागणी करता येईल. परंतु कोणतीही कर्जमागणी अर्ज हा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून शिफारस करून आलेला असावा.

९. बचत गटातर्फे कर्ज मागणी करतांना बचत गटास, गटातील सामिल झालेल्या व्यक्ती करताच कर्ज मागणी करता येईल. गटातर्फे इतर गटबाहेरील व्यक्तीकरिता कर्जमागणी करता येणार नाही.

१०. ही योजना सद्य:स्थितीत ग्रामीण भागात राबवावयाची असल्यामुळे सर्व बचतगटांना ग्रामीण भागांतील बचत गटाचे कार्यक्षेत्रातील सेवा सहकारी संस्थेमार्फतच कर्जमंजूरी व कर्जवाटप करण्यांत येईल.

११. बचत गटातील सर्व सदस्यांना संबंधीत सेवा संस्थेचे कायम सभासद व्हावे लागेल. तसेच बचत गटास बँकेचे नाममात्र सभासद व्हावे लागेल.

१२. बचत गटातील ज्या व्यक्तीस कर्ज देण्यांत आले, त्या व्यक्तीच्या कर्जाची परतफेड पूर्ण होईपर्यंत त्याला पुन्हा कर्ज देता येणार नाही. तसेच बँकेने एकदा कर्जवाटप केलेल्या गटाला त्यानंतर त्यांचे अंतर्गत कर्ज व्यवहार बंद करावा लागेल व दरमहा बचतीची संपूर्ण रक्कम बँकेत जमा करावी लागेल व अंतर्गत कर्ज व्यवहार करतांना बँकेची परवानगी वा शिफारस आवश्यक आहे.

१३ बँकेने गटास मंजूर केलेली कर्ज रक्कम गटाने संबंधीत सभासदांस अदा करावी. तसेच वसुली करतांना सभासदाने गटाकडे जमा करावी व गटाने ती रक्कम बँकेत भरावी. कर्ज दिल्यानंतर संबंधीत सभासदाने त्याचा योग्य विनियोग केला किंवा नाही याचे विनियोग दाखले गटांना संस्थेमार्फत बँकेत सादर करावे.

१४. गटातील सदस्यांचे वैयक्तिक कर्ज मागणी अर्ज गटाने विहित नमुन्यांत स्विकारावा तसेच सर्व अर्ज गटाचे शिफारस अर्जासह संबंधीत सेवा संस्थेमार्फत बँकेला सादर करावे. बँकेचे कर्ज व देव व्यवहार करण्याचे अधिकार ज्यांना बचत गटाने दिलेले आहेत, त्या बाबतच्या ठरावासहीत अर्ज बँकेला सादर करावा लागेल.

१५. कर्ज मंजूर करतांना गटाने लहान लहान उद्योग सुरू करणे, चालू व्यवसायाची आर्थिक गरज भागविणे इत्यादी उत्पादक कामासाठीच सदर कर्जाचा विनियोग करावा जेणेकरून सभासदाचे जीवनमान उंचावून त्यांचे आर्थिक उत्पन्नांत भर पडेल. या बाबींचा प्राधान्याने विचार व्हावा.

१६. बचत गटाला देण्यांत येणाऱ्या कर्जाची परतफेड मंजूर कर्ज विचारात घेता कमीत कमी १२ महिने व जास्तीत जास्त ३० महिन्याच्या कालावधी राहील. या कालावधीत बचत गटास दरमहा व्याजासह कर्ज हप्त्याची परतफेड करावी लागेल. कर्ज परतफेड किती हप्त्यात करावयाची हे कर्ज मंजूरी पत्रात कळविले जाईल.

१७. बचत गटास दिलेल्या कर्जाचा व्याजदर हा -

अ. बँक ते सेवा सहकारी संस्था यांना --- ११%

ब. सेवा सहकारी संस्था ते बचत गट --- १२%

क. बचत गट ते वैयक्तिक सभासदांना गट ठरवेल त्याप्रमाणे राहील. थकित झालेल्या कर्ज रकमेवर सर्व स्तरावर ३ टक्के जादा दंड व्याज आकारण्यांत येईल.

१८. मंजूर करावयाचे कर्जदर हे बँकेने ठरविलेल्या विविध कारणनिहाय युनिट कॉस्टनुसार राहतील. तसेच एकत्रित रित्या प्रकल्पा अंतर्गत मागणी असल्यास प्रकल्पाची छाननी करून आर्थिक व तांत्रिक क्षमता पाहून कर्ज मंजूर केले जाईल.

१९. बचत गटाला कर्जवाटप करतांना बचत गटाची आर्थिक उलाढाल विचारांत घेऊन प्रथम १:१ या प्रमाणांत कर्ज मंजूर केले जाईल. त्यानंतर बचत गटाचे विश्वासार्हतेवरून हे प्रमाण १:४ या प्रमाणापावेतो विस्तारीत करता येईल.

२०. कर्जवाटपापूर्वी ५० रु.च्या स्टँपपेपरवर बचत गटाच्या सदस्यांना नियमित वसुलीचे विहित नमुन्यातील हमीपत्र भरून द्यावे लागेल. त्याचप्रमाणे बँकेने पुरस्कृत केलेले प्रॉमीसरी नोट, करारनामा, अर्ज, कबुलीचे पत्र व केडीगुडयिंग बॉंड कर्ज वाटपापूर्वी गटास भरून द्यावे लागेल.

२१. बचत गटातील वैयक्तिक भागदारकास किमान कर्ज रकमे इतपत त्याची स्थायी मालमत्ता गहाणांत द्यावी लागेल. किंवा मालमत्ता नसल्यास बचत गटाला सामुहीक रित्या कर्जदारांचे जामिन स्वीकारावे लागेल. कर्ज थकित झाल्यास बचत गटाचे बचत खात्यावरील व्यवहार थांबविण्याचे अधिकार बँकेस राहील.

२२ बचत गटाचे हिशेब तपासणी करण्याचे संपूर्ण अधिकार बँकेचे अधिकारी यांना राहतील.

२३. बचत गटाला मासिक सभेची वेळ, स्थळ व तारीख संबंधित शाखेचे अधिकारी यांना नियमित कळवावी लागेल. तसेच शाखाधिकारी यांनी गटाचे सभेत उपस्थित राहून सभेचा अहवाल नियमितपणे मुख्यालयास पाठवावा.

२४. बचत गटास कर्जावर दिलेल्या वस्तू, मशिनरी इत्यादि बँकेच्या नजर गहाणांत द्याव्या लागतील. आवश्यक त्या ठिकाणी मालाचा व वस्तुंचा विमा उतरवावा लागेल.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७५:- बँकेच्या ग्राहकांना बँक गॅरंटी उपलब्ध करून देण्याबाबतचा नॉन फंडेड व्यवसाय सुरू करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७५:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगीतले की, सहकारी बँकींग व्यवसायांत सुरु असलेली स्पर्धा विचारांत घेता उपलब्ध भांडवलाचे आधारे निरनिराळे व्यवसाय करून स्पर्धेत उतरणे अपरिहार्य कार्य झाले आहे. बिगर भांडवली व्यवसाय (Non funded Bussiness) उदा. बँक गॅरंटी देणे, एल. सी. देणे इत्यादि सुरु केल्यास कमिशनद्वारे उत्पन्नात वाढ होईल. व अशा सवलतीपोटी ग्राहकांकडून मार्जीनमनी घेऊन ठेवीत वाढ करता येईल. हा व्यवसाय करणेकरिता बँक शेड्युल्ड बँक असणे आवश्यक आहे. तथापी आपली बँक रिझर्व बँकेच्या मानकानुसार शेड्युल्ड नसल्याने या संदर्भात एचडीएफसी बँकेशी करार केला असून, त्यांनी नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँकेच्या हमीवर आपल्या खातेदारांना/ग्राहकांना बँक गॅरंटी सुविधा देण्याचे मान्य केले आहे. व त्यांनी दिनांक १२.१२.२०००चे कार्यालयीन पत्रानुसार कळविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या ग्राहकांना बँक गॅरंटी उपलब्ध करून देण्याबाबत स्विकृती प्रदान करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत आले. व ह्या सर्व व्यवहारावर सरव्यवस्थापक/व्यवस्थापक यांचे स्वाक्षरीने कार्यवाही करावी. याकरिता खालील प्रमाणे ठराव करण्यांत यावा असे ठरले.

## RESOLUTION

This meeting of Board of Directors of Nagpur District Central Cooperative Bank Ltd; Nagpur held on 19.12.2000 unanimously resolves to ~~avil~~ "avail non-fund based facility from HDFC Bank Ltd, and empowers General Manager/Manager to execute all related documents on beh of the Bank."

ठराव ~~सर्वानुमते~~ मंजूर

विषय क्रमांक ७६:- भिवापूर येथे बँकेची स्वमालकीची इमारत बांधण्याकरिता भिवापूर कृषी उत्पन्न बाजार समितीकडून जागा लिजवर घेणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ७६:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, नागपूर जिल्ह्यांत १३ तालुक्याचे ठिकाणी बँकेच्या शाखा आहेत. त्यापैकी १२ ठिकाणी बँकेच्या स्वमालकीच्या इमारती आहेत. फक्त भिवापूर-

तालुक्याचे ठिकाणी बँकेची शाखा स्वमालकीची इमारत नसल्यामुळे किरायाचे इमारतीत आहे. भिवापूर येथे बँकेची स्वमालकीची इमारत असणे याकरिता जागा मिळण्याबाबतचे प्रयत्न सुरु होते. कृषि उत्पन्न बाजार समिती भिवापूर यांना जागा उपलब्ध करुन देणेकरिता विचारणा करण्यात आली होती. त्यांनी बँकेला जागा उपलब्ध करुन देणेबाबत कळविले असून त्यांचेकडून बँकेला शाखा कार्यालयासाठी इमारत बांधणेकरिता लिजवर जागा देणेबाबत प्रस्ताव आला आहे. बँकेचे संचालक श्री राऊत यांनी पुढाकार घेऊन दिनांक १२.१२.२००० रोजी या प्रस्तावावर कृषि उत्पन्न बाजार समिती, भिवापूरचे सभापती यांचेशी चर्चा घडवून आणली व बँकेला स्वमालकीची इमारत बांधणेकरिता भिवापूर येथे कृषि उत्पन्न बाजार समितीची ५००० चौरस फुट जागा ५० वर्षाचे लिजवर रुपये २.०० लाख किंमतीत देण्यात यावी अशी चर्चा झाली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन (x)" ~~(भिवापूर येथे कृषि उत्पन्न बाजार समितीची ५००० चौरस फुट जागा रुपये २.०० लाख किंमतीत ५० वर्षाचे लिजवर घेण्यात यावी)~~". या जमिनीची लिजडिड करण्याबाबतचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक/प्रभारी व्यवस्थापक यांना राहतील. त्या जागेवर इमारत बांधणेसाठी आर्किटेक्टकडून एस्टीमेट मागविणे व त्या अनुषंगिक कार्यवाही करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे. असेही ठरले.

(x) भिवापूर तालुका सुपरविजन सोसा. व सह. नि. बंधकसह. संस्था भिवापूर यांनी सुद्धा बँकेच्या नियोजित स्वमालकीचे जागेत त्यांना जागा मिळावी अशी विनंती केल्यामुळे ५००० चौ. फुटा ऐवजी भिवापूर बाजार समितीची सलग १०८६० चौ. फुटाच्या संपूर्ण प्लॉट खरेदी करुन तालुका स्तरावर चांगली इमारत बांधण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १७:- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक १७(१). राष्ट्रिय बँकेनी कळविलेल्या ~~दरानुसार~~ सुधारीत युनिट कॉस्टनुसार बँक कर्जदरात करावयाच्या बदलास मंजूरी देणेबाबत.

ठराव क्रमांक १७(१) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, सेवा सहकारी संस्थांचे मार्फतीने शेतकऱ्यांना शेतीचे विकासाकरिता तसेच उत्पन्नांत वाढ होण्याचे दृष्टीने विविध शेती विकास करण्याकरिता राष्ट्रीय बँकेनी वेळोवेळी कळविलेल्या युनिट कॉस्टनुसार ठरविण्यांत आलेले कर्जदर मा० संचालक मंडळाचे सभेत मंजूर करवून, त्यानुसार बँक कर्ज उपलब्ध करुन देत असते. राष्ट्रिय बँक पूणे यांनी त्यांचे पत्र क्र. एन.बी.पी.एन. आय.सि.डी./पी.एफ/१९२६/युसी/२०००-०१ दिनांक २१.७.२००० अन्वये सुधारीत युनिट कॉस्ट बँकेला कळविल्या आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन राष्ट्रिय बँकेने सुचविलेल्या कर्ज

कारणाकरिता सुधारीत दरानुसार कर्जवाटपाचे दरांत कर्ज मंजूरीस्तव बदल करण्यांत यावा. व ज्या कर्ज कारणाकरिता सुधारीत कर्जदर सुचविले नाहीत व कर्जदरांत कोणताही बदल केला नाही त्या कर्जकारणाकरिता सध्याचे प्रचलित दर कायम राहतील असे ठरले. राष्ट्रीय बँकेने कळविल्यानुसार सुधारीत युनिट कॉस्ट दर खालील प्रमाणे राहतील.

| अ. क्र. | कर्जाचे कारण | सध्याची प्रचलित युनिटकॉस्ट. | राष्ट्रीय बँकेनी कळविलेली सुधारीत युनिटकॉस्ट | मंजूर केलेली युनिट कॉस्ट |
|---|---|---|---|---|
| १. | नविन विहिर खोदणे व बांधणे — | | | |
| | अ) रींग पध्दतीची विहिर. (किमान ३ मीटर व्यास × १४ मीटर खोल) | ४६००० | ६०००० | ६०००० |
| | ब) प्रथम खोदणे व नंतर दगडाविटांनी बांधणे | ५२००० | ६१५०० | ६१५०० |
| २. | जुनी विहिर दुरुस्ती / खोल करणे. — | | | |
| | अ) रिंग पध्दतीची विहिर | ५२०० | ५७०० | ८००० |
| | ब) दगड विटांनी बांधलेली विहिर | ९९०० | १०७०० | १०७०० |
| ३. | दुभती जनावरे खरेदीकरिता — | | | |
| | अ) संकरीत जर्सी गाय | १२५०० | १२ ते १४००० | १४००० |
| | ब) थारपारकर, गिर, हरियाना, देशी | ६००० | ६६०० | ६६०० |
| | क) ग्रेडेड मुऱ्हा, मेहसाना | १५००० | १४ ते १६००० | १६००० |
| | ड) सुर्ती म्हैस | १३००० | १२ ते १४००० | १४००० |
| | ई) नागपुरी, मराठवाडा, गावरानी | ११००० | १० ते १२००० | १२००० |
| ४. | शेळी पालन — | | | |
| | अ) बोकड खरेदीकरिता (प्रति बोकड) | २१०० | २४०० | २४०० |
| | ब) शेळी खरेदीकरिता (प्रति शेळी) | १७०० | २१०० | २१०० |
| | क) शेड व पुरक साहित्य (पांच गायचे युनिटकरिता) | २०० | २०० | २०० |

| | | कोटेशन किंमतीच्या | किंवा जास्तीत जास्त. |
|---|---|---|---|
| ५. | मळणी यंत्र खरेदीसाठी | | |
| | अ) मळणी यंत्र - २७००० कोटेशन नुसार मंजूरीची शिफारस आहे. (इले. मोटारसह - ५ हॉ.पा.) | ८०% | ३५००० |
| | ब) मळणी यंत्र - ३०,००० — ,, — (आईल इंजिनसह - ५ हॉ.पा.) | ८०% | ४०,००० |
| | क) धान मळणी यंत्र - ८५००० — ,, — (इले. मोटरसह) | ८०% | ६०,००० |

६. पाईप लाईन करिता पीव्हीसी पाईक व वितरीका

| पाईपचा व्यास | प्रेशर | सध्याचे प्रचलित युनिटकॉस्ट: प्रति मिटर (रुपये) | सध्याचे प्रचलित युनिटकॉस्ट: खोदाई व जोडाईसह (रुपये) | राष्ट्रीय बँकेनी कळविलेली सुधारीत युनिट कॉस्ट: प्रति मिटर (रुपये) | राष्ट्रीय बँकेनी कळविलेली सुधारीत युनिट कॉस्ट: खोदाई व जोडाईसह (रुपये) | मंजूरीकरिता शिफारस केलेली युनिट कॉस्ट: प्रति मिटर (रुपये) | मंजूरीकरिता शिफारस केलेली युनिट कॉस्ट: खोदाई व जोडाईसह (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७५ एमएम | ६ केजी. | २९ | ४३ | ४७ | ६१ | ४७ | ६१ |
| ७५ ,, | ६ -,,- | ४४ | ६७ | ६७ | ८३ | ६७ | ८३ |
| ९० ,, | ४ ,, | ४८ | ६९ | ६६ | ८१ | ६६ | ८१ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९० एम.एम. | ४ केजी. | ७७ | ९९ | ९९ | ११५ | ९९ | ११५ |
| ११० -"- | ४ -"- | ८० | ९४ | ९५ | १०९ | ९५ | १०९ |
| ११० -"- | ६ -"- | ११० | १३४ | १३९ | १६३ | १३९ | १६३ |
| १४० -"- | ४ -"- | १२५ | १४९ | १५८ | १८२ | १५८ | १८२ |
| १४० -"- | ६ -"- | १८३ | २१७ | २३७ | २६५ | २३७ | २६५ |
| १६० -"- | ४ -"- | १६७ | १९३ | २०७ | २३२ | २०७ | २३२ |
| १६० -"- | ६ -"- | २३९ | २६६ | ३०७ | ३४४ | ३०७ | ३४४ |
| २०० -"- | ४ -"- | २५८ | २९६ | २९१ | ३१९ | २९१ | ३१९ |
| २०० -"- | ६ -"- | ३७३ | ४०४ | २५७ | ४९७ | २५७ | ४९७ |

७. ठिबक संच विभिन्न पिकवार —

| | प्रति एकर | प्रति हेक्टर | प्रति एकर | प्रति हेक्टर | प्रती एकर | प्रती हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|
| १. चिकू/आंबा | ८३०० | १३५५० | ९००० | १६००० | ९००० | १६००० |
| २. पेरू/लिंबू | ९८०० | १७३०० | १०९०० | २०७०० | १०९०० | २०७०० |
| ३. संत्रा/मोसंबी | ९८०० | १७३०० | १०९०० | २०७०० | १०९०० | २०७०० |
| ४. डाळिंब | ९९५० | १७९०० | ११७०० | २१३०० | ११७०० | २१३०० |
| ५. केळी १.५×१.५ | १८५०० | २८९०० | १९८०० | ४१७०० | १९८०० | ४१७०० |
| -"- २.५×२.५ | १३५५० | २६००० | १९३०० | ४७५०० | १९३०० | ४७५०० |
| ६. ऊस | १८७०० | ३९२५० | २५९०० | ४७७०० | २५९०० | ४७७०० |
| ७. कापूस | १७९०० | ३६५५० | २४९०० | ५५३०० | २४९०० | ५५३०० |
| ८. भाजीपाला | १९००० | ४२८०० | २८९०० | ६३३०० | २८९०० | ६३३०० |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १७(२) - खाते चौकशीकरिता मेहनताना वाढवून मिळणेबाबत श्री व्ही.एस.धाराशिवकर यांचे विनंती अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक १७(२) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री. व्ही. एस. धाराशिवकर यांना बँकेचे पॅनेलवर खाते चौकशी अधिकारी म्हणून मा० व्यवस्थापक समिती दिनांक २०.४.९९ चे सभेतील निर्णयानुसार नियुक्त करण्यांत आले होते. त्यावेळी श्री व्ही.एस. धाराशिवकर यांनी रु.२५००/- मेहनताना प्रति केसप्रमाणे मिळावा अशी मागणी केली होती. परंतु इतर खाते चौकशी अधिकाऱ्यांना जेवढा मेहनताना देण्यांत येतो होता तेवढाच रु.१५००/- प्रती केस प्रमाणे यांनाही देण्यात यावा असे ठरल्यानुसार देण्यांत येत आहे. श्री धाराशिवकर यांनी खाते चौकशी करण्याकरिता मेहनताना वाढवून मिळावा म्हणून दिनांक २.९.२००० रोजी अर्ज करुन विनंती केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री एस० व्ही० धाराशिवकर यांनी खाते चौकशीचे कामाच्या मेहनताना वाढविण्याबाबत केलेल्या मागणीवर

वाटाघाटी करुन मेळतताना ठरविण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १७(३) श्री आर. आर खोबरागडे (टर्मीनेट) "ब" वर्ग अधिकारी, मुख्य कार्यालय नागपूर यांचे देय ग्रॅच्युईटी बाबत.

ठराव क्रमांक १७(३) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री रामकृष्ण रामचंद्र खोबरागडे यांना प्रशासन विभाग, मुख्य कार्यालय, नागपूर येथे "ब" वर्ग अधिकारी असतांना दिनांक २५.१०.२००० पासून बँकेच्या सेवेतून कमी (Terminate) करण्यांत आले आहे. त्यांनी उपदानाची रक्कम मिळावी याकरिता अर्ज दिलेला आहे. त्यांचे ग्रॅच्युईटीची रक्कम रुपये २०४११९/- असून बँकेला त्यांचे कडून कांहीही घेणे नाही. परंतु स्टॉफ क्रेडीट सोसायटीचे कर्जपोटी रुपये ७९९५१/- वसुल करुन देणे आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होउन श्री आर. आर. खोबरागडे यांना देय असलेली ग्रॅच्युईटीची रक्कम रुपये २०४११९/- मंजूर करण्यांत येत आहे. श्री खोबरागडे यांनी केलेल्या अर्जानुसार त्यांना ग्रॅच्युईटीची रक्कम देणेकरिता रिलीज करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १७(४) - हेवी ड्युटी झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक १७(४) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेने यापूर्वी मे. किलबर्न कंपनीची झेरॉक्स मशिन दिनांक २७.३.९९ रोजी रु.१२२०००/- बायबॅक योजनेअंतर्गत खरेदी केली होती. झेरॉक्स मशिनमध्ये वारंवार होणारा बिघाड व मे. किलबर्न कंपनीचे इंजिनिअर्सना सांगून मशिन दुरुस्त करुन घेण्यास होणारा विलंब, यामुळे बँकेच्या कामांत निर्माण होणारा व्यत्यय, बँकेतील कागदपत्रांच्या झेरॉक्स करिता बाहेरुन काढणेकरिता होणारा खर्च याबाबी विचारांत घेता बँकेकरिता नविन झेरॉक्स मशिन खरेदी करावी असे वाटते. झेरॉक्स मशिनमध्ये वारंवार बिघाड होत असल्यामुळे मे० किलबर्न कंपनी विरुध्द कंझुमर्स कोर्टात दिनांक २१.१२.९९ रोजी दावा दाखल केला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेकरिता हेवी ड्युटी झेरॉक्स मशिन खरेदी करण्यांत यावी असे ठरले. हेवी ड्युटी झेरॉक्स मशिन खरेदी करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १७(५) – बँकेने कर्जवसुलीसाठी कार्यवाही करून लिलावामध्ये विकलेल्या ट्रॅक्टर खरेदीसाठी कर्ज मंजुरीबाबत्चे सुधारीत धोरणास विचार करून मान्यता देणे.

ठराव क्रमांक १७(५) – मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँक कर्जाविर दिलेली लक्झरी बस, ट्रक मीनी ट्रक, ट्रॅक्टर जीप इत्यादि वाहनांची कर्ज रक्कम सभासदांकडून मुदतीच्या आंत परतफेड न झाल्यास थकित कर्जाचे वसुलीकरिता कर्जावर दिलेल्या वाहनांची जप्ती करून अशा वाहनांच्या लिलाव करण्यांत येतो. अशाप्रकारे लिलावांत काढलेल्या वाहनांची खरेदी करण्याकरिता कर्ज उपलब्ध करून देण्याचे धोरणास मा॰संचालक मंडळाच्या दिनांक ५.५.१९९६ च्या सभेत ठराव क्रमांक २४(७) नुसार मंजूरी दिली होती. या निर्णयानुसार लिलावातील ट्रॅक्टर करिता ठरविण्यांत आलेल्या कर्ज धोरणांत कांही आवश्यक बदल केल्यास लिलावातील ट्रॅक्टर खरेदीला प्रतिसाद मिळून कर्ज वसुली होण्यास मदत होईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे लिलावातील ट्रॅक्टर खरेदीकरिता कर्ज देण्याचे खालीलप्रमाणे असलेल्या सुधारीत धोरणास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

कर्ज धोरण.

१. कर्ज मागणी करणाऱ्या सभासदाजवळ स्वमालकीची किंवा कुटुंबातील किमान १० एकर बारमाही ओलीताची किंवा १६ एकर हंगामी ओलीताची किंवा २४ एकर कोरडवाहू शेती आवश्यक आहे.

२. जमीन ओलीताखाली असल्याबाबत संबधीत सिंचन खात्याने किंवा तलाठ्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शाखा निरिक्षकाकडून जमीनीचे ओलीतासंदर्भात स्थळ तपासणी अहवाल सादर करावा लागेल.

3. लिलावातील ट्रॅक्टर खरेदी करणारा हा शेतकरी असुन तो किमान पांच वर्षापासून सेवा/विविध कार्य. संस्थेचा सभासद असावा. असे संस्थेने प्रमाणित करावे. अशाच सभासदासच लिलावातील ट्रॅक्टर करिता संस्थेमार्फत कर्ज उपलब्ध करून देता येईल.

४. लिलावातील ट्रॅक्टरची मुल्यांकन किंवा लिलावातील अंतिम बोलीची रक्कम यापैकी जी कमी असेल त्या रकमेचे ६०% टक्के पर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल.

५. या कर्जाची परतफेड चार समान वार्षिक हप्त्यांत करावी लागेल.

६. लिलावातील ट्रॅक्टर खरेदीकरिता घेतलेल्या कर्जावर संस्थेला द.सा.द.शे. १३% व्याजदराने आकारणी करण्यांत येईल.

७. आर.टी.ओ. टॅक्स विमा किंवा इतर खर्चाकरिता कर्ज मंजूर करता येणार नाही. तो खर्च अर्जदारास स्वत: करावा लागेल.

८. लिलावांतील वाहनासाठी कर्ज मंजूर झाल्यानंतर वाहन खरेदीदार व बँक यांचे संयुक्त नांवानी वाहनाचे परिवहन कार्यालयास पंजीकरण झाल्यानंतर खरेदीदारास वाहनाचा ताबा देण्यांत येईल. पंजीकरण व इतर खर्च अर्जदारास स्वत: करावा लागेल.

९. लिलावाद्वारे विकलेल्या वाहनांसाठी मात्र एकदाच कर्ज उपलब्ध करुन देण्यांत येईल.

१०. दिलेल्या कर्जाचे सतत दोन हप्ते थकित झाल्यास वाहन जप्तीची कार्यवाही करुन कर्जवसुली करण्यास्तव बँक पुढील आवश्यक कार्यवाही करील. जप्तीकरिता येणारा आनुषंगिक खर्च सभासदाचे खात्याला नांव टाकण्यांत येईल.

वरील प्रमुख अटीव्यतिरिक्त दिनांक २२.९.२००० नुसार असलेल्या इतर अटी याही कर्जाकरिता लागू राहतील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९७(६) – एच.डी.एफ.सी. बँक नागपूर येथे बँकेचे चालु ठेव खाते उघडणेबाबत.

ठराव क्रमांक ९७(६) – डिमांड ड्राफ्टची सवलत मिळणेसाठी एच.डी.एफ.सी. बँक नागपूर येथे चालु ठेव खाते उघडणे व त्यावर व्यवहार करणेसाठी अधिकार देणेकरिता खालील प्रमाणे ठराव करण्यांत येत आहे.

**– RESOLUTION –**

"This Meeting of Board of Directors of the Nagpur District Central Cooperative Bank Ltd., Nagpur. held on 21-19.12.2000 at Nagpur Unanimously resolved that to open current account with HDFC Bank, Nagpur to avail at par D.D. payable facility and to operate the account for nonfund based facilities to be extended under the agreement. The following any authority shall operate the account whose signatures are attested below alongwith signature of Group 'B' officers of the Bank.

1) Shri A.N. Choudhari ... General Manager.
2) Shri S.S. Gode ... Manager.
3). Shri S.D. Peshkar ... Chief Accountant.
4) Shri S.S. Aglawe ... Dy. Chief Accountant.

Group 'B' -
1) Shri M. B. Wakhare --- Accountant
2) Shri S. G. Borkar --- Accountant
3) Shri K. Z. Dhole --- Accountant.
4) Shri T. T. Dahake --- Accountant.

passed unanimously

विषय क्रमांक १७(७) - नागपूर शहरांतील हुडकेश्वर लेआउट मध्ये बँकेची शाखा उघडणेकरिता विचार करणे.

ठराव क्रमांक १७(७) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगीतले की, गट ग्रामपंचायत नरसाळा, तालुका नागपूर यांनी हुडकेश्वर लेआउट मध्ये बँकेची शाखा उघडणेबाबत ठरावासह विनंती केली आहे. सदर भागातील लोकसंख्या २५०००चे जवळपास असून, या भागांत आपले बँकेची जवळपास शाखा नाही. तेथील लोकांना आपल्या बँकेचे शाखेत व्यवहाराकरिता गणेशपेठ येथे २०किलोमिटर अंतर यावे लागते. बँकेने हुडकेश्वर लेआउट या परिसरांत बँकेची शाखा उघडल्यास तेथील आजूबाजूच्या वस्तीतील लोकांना बँकेचा लाभ मिळू शकतो व त्याच भागातील सेवा सह० संस्था, नरसाळा, पिपरा, खरसोली हुडकेश्वर, किरणापूर, साळई, चिकणा ह्या संस्था शाखेला जोडता येवू शकतील असेही कळविले आहे. हुडकेश्वर लेआउटमध्ये बँकेची शाखा उघडावी म्हणून विनंती केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेने हुडकेश्वर लेआउट येथे शाखा उघडल्यास स्थानिक परिसरांतील लोकांना बँकींग सेवेचा लाभ घेता येईल आणि बँकेच्या ठेवी व कर्ज व्यवहारांत वाढ होईल. तसेच कार्यरत शाखांचे कामकाज व कर्ज व्यवहाराचे विकेंद्रीकरण होईल. सदर भागातील लोकांना बँकेच्या सेवेचा अधिकाधिक लाभ घेता यावा व बँकेच्या ठेवी व कर्ज व्यवहारांत वाढ व्हावी याकरिता हुडकेश्वर लेआउट मध्ये बँकेची शाखा उघडण्यांत यावी असे ठरले. नविन ठिकाणी बँकेची शाखा उघडणेकरिता मा० सहकार खात्याची परवानगी घेणे आवश्यक असल्याने सहकार खात्यास मंजुरीकरिता ठरावासह प्रस्ताव पाठविण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १७(८) - रिझर्व बँक ऑफ इंडिया इश्यु डिपार्टमेंट, नागपूर येथे बँकेचे गॅरंटी खाते उघडणेबाबत.